Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

Ajanta
Prakashan

IMPACT FACTOR /
INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

An International Multidisciplinary Quarterly Research Journal

# AJANTA

ISSN 2277 - 5730
Volume - VIII, Issue - I, January - March - 2019
Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. रणदिवे टी. वाय.

An Recognation of the Publication of the Paper Entitled

वंचित समुदाय व प्रज्जासत्ताक भारत

Editor
Vinay S. Hatole

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | प्रजासत्ताक आणि स्त्री स्वातंत्र्य<br>**डॉ. सुधाकर एन. पवार** | १२५-१२७ |
| २८ | संविधान व शिक्षण अधिकार<br>**प्रा. सिद्धार्थ बी. टेंभूर्णे** | १२८-१३३ |
| २९ | वंचित समुदाय व प्रज्जासत्ताक भारत<br>**प्रा. रणदिवे टी. वाय.** | १३४-१३७ |
| ३० | संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे व सत्तापक्षाचे मूल्यामापन<br>**प्रा. डॉ. अशोक जाधव** | १३८-१४१ |
| ३१ | लोकशाही वास्तव आणि आव्हाणे<br>**प्रा. संजय मोतीराम मोहाडे** | १४२-१४५ |
| ३२ | भारतीय संविधान आणि मानव अधिकार<br>**प्रा. रुपेश रा. कुचेवार** | १४६-१४८ |




Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २१. वंचित समुदाय व प्रज्जासत्ताक भारत

**प्रा. रणदिवे टी. वाय.**
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर ता. आंबेगाव जि. पुणे.

## प्रस्तावना

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी व प्रगल्भ लोकशाही मानली जाते. कारण लोकशाहीत जनता सर्वोच्च असते. आजमितीस भारतिय राज्यघटनेच्या अंमलबजावणीला ६९ वर्षे पूर्ण झाली. व्यक्तीमात्रालाही प्रतिष्ठा व मानवी हक्क, सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय, वंचित घटकांना भयापासून मुक्तता व त्यांचा विकास ही लोकशाहीत दिलेली अभिवचने होती. त्यादृष्टीने मात्र भारतीय लोकशाहीची वाटचाल कल्याणकारी मार्गाने झाली. किंबहुना भांडवली आर्थिक विकास कल्याणकारी राज्याचा पदर धरून पुढे आली. मात्र कल्याणकारी राज्याची होत चाललेली घसरण व आक्रमक भांडवलप्रधान लोकशाहीचा विकास हे प्रधान हेतू भारतीय राजकीय व्यवस्थेत राहिला आहे. सन १९९१ च्या आर्थिक शिथिलीकरणाच्या प्रक्रियेमुळे वंचित घटकांचे प्रश्न अधिक गंभीर बनत आहेत. समाजातील मुठभर वर्गाला अधिकतम सुखसोई, प्रतिष्ठा, सुबता, विकास तर दुसरीकडे यापासून वंचित असणारा घटक निर्माण झाला. ज्या घटकांना अद्यापही सामाजिक, आर्थिक, व राजकीय न्याय प्राप्त झाला नाही. या सर्व पार्श्वभूमीवर वंचित समुदाय व प्रजासत्ताक भारत याचा आढावा घेणे महत्वाचे वाटते.

## भारतीय राज्यघटना व विकासाचे अभिवचने

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. घटना समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इंग्रजांचा कायदा चौकट बाजूला सारून नवे संविधान व कायदा व्यवस्थेची सुरुवात करून दिली. ज्यामध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक न्याय ही उद्दिष्टे आहेत. किमान गरजांची सार्वत्रिक पूर्तता आणि राहणीमानाचा दर्जा उंचावणे हे त्या उद्दिष्टामध्ये अभिप्रेत आहे. याचाच अर्थ स्वतंत्र भारताच्या आर्थिक धोरणांमध्ये दारिद्र्यनिर्मुलन आणि संपतीचे न्याय वितरण यांना महत्व देण्यात आले. ही जबाबदारी उदारमतवादी लोकशाहीतील चौकटीतील प्रशासनावर टाकण्यात आली. या प्रशासनाकडून असलेल्या अपेक्षा संविधानात उद्देशपत्रिकेत आणि मार्गदर्शक तत्वांमध्ये पूर्वापार आलेल्या जातीव्यवस्थेची भारतीय समाजाची विभागणी अनेक विषय गटात केली होती. भारतीय समाजातील तळपातळीवरील वर्ग विकासाच्या दृष्टीने उपेक्षित राहिला होता. या घटकांना सामाजिक स्थान गौण स्वरूपाचे होते. परिणामतः ते सामाजिक, राजकीय व आर्थिक न्यायाचे बळी ठरले होते. जोडीला पिळवणूक दारिद्र्य, विषमता हे प्रश्न होते. या सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी भारतीय संविधानामध्ये समतेचा हक्क, भेदभावापासून मुक्तता,



Scanned with OKEN Scanner

अस्पृश्यता बंदी, दुर्बल/ वंचित समुदायांच्या शैक्षणिक, आर्थिक हितसंवर्धन आणि सामाजिक अन्याय व शोषण यापासून मुक्तता करण्याची जबाबदारी प्रशासनाची राहील असे स्पष्ट सांगितले आहे.

**कल्याणकारी राज्यसंस्था व वंचित समुदाय:**

स्वातंत्र्योत्तर भारतीय लोकशाहीची वाटचाल कल्याणकारी मार्गाने झाली. स्वतंत्र भारताच्या राज्यसंस्थेला नव-वसाहतीक वर्चस्वापासून स्वायत्त राखणे त्याचबरोबर सरकारने आर्थिक नियंत्रणे घालून गरीब, वंचित घटकांसाठी विविध सेवा व सुविधा पुरवाव्यात अशी जबाबदारी येऊन पडली. यालाच कल्याणकारी राज्यसंस्था असे नाव मिळाले. नेहरूंनी स्वतंत्र भारतात लोकशाही चौकटीचा विकास घडविला तो लोकप्रियतेच्या त्यांच्या आर्थिक धोरणांना जनकल्याण आणि समाजवाद या तत्वज्ञानाची झिलई प्राप्त झाली. आर्थिक विषमता व दारिद्र्य हे दोन्ही मुद्दे औद्योगिक विकास व कल्याणकारी प्रशासन आणि लोकशाही समाजवाद याद्वारे सोडविण्यावर भर राहिला. दुसरीकडे वंचित घटक, दलित, आदिवासी, दुर्लक्षित गट, कनिष्ठ ठरलेल्या जाती यांच्या सत्ताकांक्षेचा प्रश्न लोकशाहीच्या व्यापक चर्चाविश्वात सामावला गेला.

सन १५५१ पासून योजनाबद्ध विकास घडवून आणण्यासाठी भर देण्यात आला. ज्यामुळे परिघावरच्या समूहांना विकासप्रक्रियेत सामील होणे शक्य झाले. भारत सरकारने स्वीकारलेल्या औद्योगिक धोरणविषयक निर्णयात असे स्पष्ट केले होते की, गतिमान राष्ट्रीय धोरणांची दिशा ही वाढ असली पाहिजे. त्यामुळे न्यायवितरण शक्य होईल. १९६० च्या दशकात अन्न – धान्य उत्पादनातील वाढीची जोड देण्यात आली. विशिष्ट गट ठरवून त्यांच्यासाठी योजना राबविण्यात आल्या. १९५६ मध्ये सुरु करण्यात आलेली 'सामुदायिक विकास योजना' हे त्याचे उदाहरण होय. मात्र हळूहळू कल्याणकारी राज्याचा पाया विस्कळीत होत गेला. पंतप्रधान राजीव गांधींच्या काळात तर कल्याणकारी प्रशासनाला सोडचिट्ठी देण्यात आली. सार्वजनिक क्षेत्राच्या अकार्यक्षमतेचे निमित्त पुढे करून खाजगिकरणास दिले जाणारे प्रोत्साहन, निर्बंधाचे शिथिलीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते वर्चस्व, धंदेवाईक व्यस्थापकीय दृष्टीकोन त्यांच्या लेखी गरिबी, अन्याय व विषमता निवारण्यापेक्षा बाजारी यंत्रणेला असलेले महत्व त्यामुळे वंचित घटकांचे प्रश्न आणखीन विकट होत गेले.

अशाप्रकारे कल्याणकारी राज्याचा पदर धरून आलेली पुढे प्रशासन व्यवस्था कालांतरेने भांडवलप्रधान व्यवस्थेमध्ये रुपांतरीत झाली.

**जागतिकीकरण आणि वंचित समुदाय**

सन १९९१ पासून भारतात आर्थिक शिथिलीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली तेव्हापासून भारताच्या आर्थिक दरात वृद्धी झाली. ही आर्थिक वृद्धी दर अशीच विकसित होत राहिली तर सन २०२० पर्यंत भारत जागतिक महासत्ता म्हणून उदयास येईल असे अनेकांचे म्हणणे आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेकडून मानवी गरजा आणि उपलब्ध साधने

अपेक्षित असते. जागतिकीकरणाच्या धोरणाने हा समन्वय गेल्या २८ वर्षात योग्य पद्धतीने साधला आहे असे म्हणता येणार नाही. या धोरणाने आयातकाराचे प्रमाण घटविले , विदेशी भांडवलाला अधिक वाव दिला. नियंत्रणे, निर्बंध कमी केले. सार्वजनिक क्षेत्रे खुली केली. शासनाच्या विविध क्षेत्रातील आर्थिक सहभाग कमी केला. निर्गुंतवणुकीला प्राधान्य, खाजगीकरणाला चालना, आर्थिक आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणात बदल, हे बदल करत असताना आम्ही नवा चेहरा आणू असे धोरणकर्त्यांनी सांगितले. चेहरा बदलला; पण कुणाचा? किती टक्के लोकांचा? हा प्रश्न शिल्लक राहतोच.

आक्रमक नवभांडवलप्रधान लोकशाहीमुळे समाजातील तळपातळीवरचे घटक दडपले जात आहेत. मुक्त बाजारपेठेच्या नावाखाली सरकार सर्व लोकांच्या कल्याणासाठी काम करण्याची घटनात्मक जबाबदारी झटकू लागला आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाच्या केंद्रस्थानी माणसाएवजी वस्तू व गिऱ्हाईकाएवजी बाजारपेठ आहे.

१९९१ नंतर गेल्या २८ वर्षात समृद्धी वाढल्याचा दावा केला जातो. परंतु समतेचे काय? नदीच्या पुररेषेप्रमाणे सरकार गरिबीची रेषा मनमानी पद्धतीने निश्चित करीत आहे. भारतातातील ७७% जनता दरडोई २० रु. खर्च करू शकत नाही. कुपोषणामुळे वाढलेले बालमृत्यूचे प्रमाण, वृद्धांची ससेहोलपट, जीवनावश्यक वस्तूंची महागाई यामुळे भारतीय जनता त्रस्त आहे. आर्थिक उलाढालीतील ही अस्पृश्यता वेगळ्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न राज्यसंस्था करीत आहे. अस्पृश्यता केवळ सामाजिक नसते त्यातही जात व्यवस्था प्रधानतत्व असतो. आज जात वंचिताना हरघडी रस्त्यावर यावे लागत आहे.

आंतरराष्ट्रीय धोरण संशोधन संस्थेने २०१८ सालासाठीचा जागतिक भूक निर्देशांक नुकताच प्रसिद्ध झाला. ह्यामध्ये भारतातील उपासमारीचा सखोल अभ्यास केला असून त्यासंबंधात जे निष्कर्ष काढले आहेत. ते अत्यंत चिंताजनक आहे. भूक निर्देशांकाप्रमाणे उपासमार नष्ट करण्यासाठी एकूण ११९ देशांमध्ये भारताचा १०३ वा आहे. देशातील ३७% टक्के जनता उपासमारग्रस्त आहे. जगातील एकूण कुपोषित बालकापैकी साधारण ४२.५% बालके भारतामध्ये आहे. तर ६५ टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे.

## निष्कर्ष

जागतिकीकरणाच्या धोरणामुळे समाजाची विभागणी दोन गटात झाली. अतिसंपन्न गट व अतिदरिद्री गट. आज आर्थिक, सामाजिक निर्णय प्रक्रियेच्या दृष्टीने वंचित समुदाय अधिकाधिक दुर्बल व बिनमहत्वाचे बनत चालले आहे. भारतीय समाजव्यवस्थेत सांस्कृतिक विश्वाचा चेहरा संपन्न गटाच्या मुल्यकल्पनांच्या आधारे आकारला जात आहे. भांडवल प्रधान लोकशाही अमानुष स्पर्धेवर आधारित व तकलुपी असल्यामुळे ती वंचितांच्या हिताची ठरणे शक्य नाही. प्रगल्भ संस्थात्मक जीवन हा स्थिर लोकशाहीचा आधार असतो. लोकशाही सतत विकसनशील असायला हवी. लोकशाहीच्या स्थैर्यापेक्षा वंचित समुदायांच्या आकांक्षा सामावून घेण्याची लवचिकता जास्त महत्वाची ठरते. त्यादिशेने ७० व्या भारतीय प्रजासत्ताक दिनी मंथन होणे महत्त्वपूर्ण आहे.



Scanned with OKEN Scanner

संदर्भसूची

१. पळशीकर सुहास २००४, समकालीन भारतीय राजकारण, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

२. कसबेकर विजय संपा. १९८९, राजकीय विचारप्रणाली सिद्धांत आणि व्यवहार, श्रीरामपूर, प्रा.एस. आर. भोर प्रकाशन.

३. यादव योगेंद्र, पळशीकर सुहास, डिसुझा पीटर संपा. २०१०,लोकशाही जिंदाबाद, पुणे, समकालीन प्रकाशन.

४. डॉ. आढाव बाबा २०१२, भारतीय राज्यघटना आणि आपण

५. डॉ. मुणगेकर भालचंद्र २०११, आदर्श लोकशाही आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

६. Malik & Kapur (Edi.) 1998 India: Fifty years of Democracy & Development, New Delhi, APH Publishing Corporation.

Scanned with OKEN Scanner